**श्री. यशवंतराव चव्हाण**
**परराष्ट्र मंत्री, भारत सरकार**
**१ डिसेंबर, १९७४**

शिवाजी विद्यापीठाचे कुलपती, कुलगुरू, शिक्षक, विद्यार्थी आणि बंधुभगिनीनो,

आपल्या विद्यापीठाच्या दीक्षान्त भाषणासाठी बोलावून आपण मला जो मान दिला आहे, त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठात मी यापूर्वी अनेकवेळा आलो आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून माझा या विद्यापीठाशी निकटचा संबंध आल्यामुळे या भव्य आणि उदात्त विद्यानगरीचा क्रमशः झालेला विका मी पाहिला आहे. कोल्हापूरशी तर माझे संबंध माझ्या विद्यार्थी अवस्थेपासूनचे आहेत. यामुळे आपल्या या शहराविषयी आणि विद्यापीठाविषयी मला नेहमीच जिव्हाळा आणि प्रेम वाटत आले आहे. परिचयाने ते कमी न होता सदैव वाढते असा माझा अनुभव आहे. आपणांस या दोहोंविषयी वाटणाऱ्या रास्त अभिमानात मीही सहभागी आहे. आपल्या विद्यापीठाला आजचे स्वरुप आणि महत्त्व प्राप्त होण्याला विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अप्पासाहेब पवार यांचे निष्ठायुक्त परिश्रम कारणीभूत आहेत याचा कृतज्ञतापूर्वक उललेख करणे आवश्यक आहे. या शहराची उादरणीय ऐतिहासिक परंपरा अप्पासाहेबांनी आत्मसात केली आहे; इतिहासाचे ते एक थोर पंडित आहेत; आणि महाराष्ट्राचे शिक्षणसंचालक आणि या विद्यापीठाचे कुलगुरु या नात्याने ते अत्यंत उत्तम प्रशासक म्हणूनही प्रसिध्द आहेत. परंपरा, पांडित्य आणि प्रशासन यांचा इतका उत्कृष्ट मिलाप क्वचितच दृष्टीस पडतो. त्यांच्यासारखे कुलगुरु आरंभीच लाभल्याने विद्यानगरीचे हे महान रुप आपणास पहावयास मिळत आहे; अनेकांचे एक स्वप्न साकार झाले आहे असे मला वाटते.

या वर्षीच्या दीक्षान्त समारंभात भाग घेताना मला विशेष आनंद वाटतो. एका अर्थी केवळ कोल्हापूरच काय, परंतु सर्व महाराष्ट्राच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीनेही हे अत्यंत मोलाचे वर्ष आहे. राजर्षी श्री छत्रपति शाहू महाराजांची जन्मशताब्दी आपण या वर्षी साजरी केली, छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाचा त्रिशत सावत्सरिक उत्सव केला आणि भगवान महावीर स्वामींचा २५०० वा निर्वाणदिन आपण नुकताच पाळला आहे. भारताच्या दीर्घकालीन इतिहासाचे स्मरण करुन देणारे आणि सर्वांनी नतमस्तक व्हावे असे हे तीन महत्त्वाचे दिव्य आणि अक्षय संदेश देण्याचे, अन्ययाविरुध्द झगडण्याची प्रेरणा देण्याचे, जिद्द निर्माण करण्याचे आणि समतेचे नैतिक अधिष्ठान प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य या इतिहासात आहे. जीवनाच्या या शाश्वत मूल्यांना उजाळा देणारे हे वर्ष. अशा वेघळी सभोवताली दलित समाजावर वेळोवेळी होत असलेले अन्याय पाहिले म्हणजे उबग येते, खंत वाटते, आत्मदंडन

करावेसे वाटते. सामाजिक समतेची या शहराची आणि येथील शिक्षणकार्याची प्रेरणा आहे; या विद्यापीठाचीही हीच प्रेरणा आहे. म्हणून येथे शिक्षण घेत असलेल्या वा या विद्यापीठाची पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांची या बाबतीत खास जबाबदारी आहे असे मी मानतो आणि ती आपण दक्षतेने पार पाडाल अशी आशा बाळगतो. यावर्षी कलेच्या या माहेरघरी, विद्यानगरीच्या येथील पवित्र परिसरात तरुणांना भेटण्याची जी संधी दिलीत याबद्दल आपल्या विद्यापीठाचा मी ऋणी आहे.

देशातील आर्थिक किंवा राजकीय परिस्थितीची चर्चा येथे करण्याचे कारण नाही, अशा चर्चेचा हा प्रसंग नव्हे. ही परिस्थिती सर्वांनाच अस्वस्थ करणारी आहे हे खरे. या अस्वस्थतेची तात्पुरती किंवा तात्कालिक कारणे काहीही असोत; मी नुकताच उल्लेख केलेली वा तत्सम मूल्ये धोक्यात येत आहेत अशी अनेकांची भावना होऊ लागली आहे. आजच्या अस्वचस्थतेच्या मुळाशी असलेले स्थायी स्वरुपाचे कारण हेच होय, असे मला वाटते. अर्थात शाश्वत मूल्यांना धक्का देणारी, सामाजिक जीवनात वा वर्तनात त्यांचे स्थान कमी किंवा नष्ट करणारी आजची परिस्थिती आहे की काय याबद्दल मतभेद होऊ शकतात. परंतु तशी ती आहे असे मानल्यास मात्र ती चिंतेची बाब होणे अत्यंत स्वाभाविक आहे. माझ्या मताने या संभाव्य मतभेदाच्या पलीकडे असा चिंतेचा एक विषय शिल्लक राहातोच. त्याविषयी थोडेसे सांगणे आवश्यक आहे.

आमच्या आजच्या सगळ्याच समस्या दिवसेंदिवस मोठ्या, गुंतागुंतीच्या आणि कठीण होत आहेत हे खरे. ही गुंतागुंत आम्ही आपल्या वर्तनाने अधिक वाढवली की कमी केली हा प्रश्न विद्यापीठाच्या परिसरात क्षणभर बाजूस ठेवू या. सामान्यत: आपले लक्ष याच प्रश्नावर केंद्रित होत असते. आर्थिक हितसंबंधांच्या, सामाजिक जातीजमातीच्या, धार्मिक वा भाषिक गटांच्या किंवा राजकीय पक्षोपपक्षांच्या स्पर्धेत वा कलहात असे होणे स्वाभाविक आहे. तथापि विशिष्ट प्रऋसंग वा घटनांच्या बाबतीत दोष कुणाचा वा श्रेय कुणास द्यायचे याचा विचार करीत असताना मूळ प्रश्नाच्या विस्ताराकडे, स्वरुपाकडे दुर्लक्ष होता कामा नये, एवढेच मला सुचवायचे आहे. उदाहारणार्थ, अन्नधान्याच्या वाटपपध्दतीतील गुणदोष अवश्य तपासले पाहिजेत. परंतु तसं करीत असताना दरवर्षी अडीच टक्के वाढ होत असलेल्या साठ कोटी जनतेसाठी पुरुसे धान्य उत्पादन करण्याच्या व पुरविण्याच्या प्रश्नाचे स्वरुप नजरेआड होऊ नये. विद्यापीठाच्या परिसरात तरी हे प्रश्न अशा वास्तव स्वरुपात मांडले व तपासले जाणे आवश्यक आहे. निरनिराळ्या प्रश्नांच्या अशा तपासणीकडे लक्ष पुरविल्याने तात्कालिन गुणदोषांची कारण मीमांसा थोडीशी अधिक जबाबदारीने होऊ शकेल असे वाटते. हे गुणदोष चर्चिलेच पाहिजेत. लोकशाही पध्दतीत योग्य मार्ग अशा चर्चेतूनच सापडू शकेल, असा माझा विश्वास आहे.

प्रत्यक्ष कृतीत गुंतलेल्या कार्यकर्त्यांच्या मार्गावर योग्य प्रकाश पडावा अशा अपेक्षा बाळगताना

विद्यापीठांना अग्रस्थान द्यावे लगेल. परंतु आजच्या भारतातील विद्यापीठांचा वा सर्वच शिक्षणसंस्थांचा विचार करताना सर्वत्र निराशेचा सूर निघतो ही माझ्या समजुतीने अधिक चिंतेची वादातीत बाब म्हणावी लागेल. वर्तमान परिस्थिती कठीण खरीच. सारेच प्रश्न अधिकाधिक कठीण होत चालल्यासारखे दिसतात. ते सोडविणे जसे आमच्या हाती आहे, तसे ते जागतिक परिस्थितीवरही अवलंबून आहे. याचा प्रत्यय अलिकडे सर्वच राष्ट्रांना येऊ लागला आहे. आधुनिक विज्ञान व तंत्रविद्या यांच्या योगाने सर्वांचेच भवितव्य परस्परावलंबी झालं आहे. सर्व घटकांचा संकलित विचार केल्यावाचून इतःपर कोणासही पुढे जाता येणार नाही. तथापि या बाबतीत भविष्यकाळाविषयी तशी आशा वाटू शकेल काय ? या प्रश्नाचे उत्तर सांगताना शिक्षणक्षेत्राकडेच वळावे लागेल. यामुळेच आजची परिस्थिती अधिक चिंताजनक वाटते. कारण शिक्षणाविषयीची निराशा ही भविष्याविषयीची निराशा होय.

या निराशेचे आविष्कार विविध स्वरुपात पहावयास मिळतात. सभोवतालच्या प्रत्यही वाढत्या गुंतागुंतीच्या परिस्थितीवर मात करण्याच्या बाबतीत, तिला योग्य आकार देण्याच्या बाबतीत शिक्षण अपयशी ठरले आहे. यातून ही निराशा उद्‌भवते; आणि सामाजिक वातावरणाचे सर्व दोष शिक्षणक्षेत्रात प्रकर्षाने दिसू लागल्याने ती दुणावते. या निराशेच्या भावनेतून अनेक वडिलधारी मंडळी आजचे शिक्षण अगदी कुचकामाचे झाले आहे; आजची शिक्षणपध्दती आमूलाग्र बदलली पाहिजे, थोडीफार सुधारणा केल्याने, लहानसहान बदल करुन कार्यभाग साधणार नाही, असे म्हणू लागली आहेत. हे मूल्यमापन बरेच अर्थपूर्ण आहे यात शंका नाही. तथापि सर्वच शिक्षणकार्याला दूषण देणे फारसे समर्थनीय वा योग्य होणार नाही असे वाटते. कोणत्याही प्रकारचे असो, शिक्षण हे सर्वथैव दोषास्पद असू शकत नाही; ते काही दुष्कर्म नव्हे. त्यात दोष असू शकतात – नव्हे आहेत. तथापि वाढत्या पिढीचा शिक्षणावरील विश्वासच नाहीसा करणे हा काही शिक्षणपध्दती सुधारण्याचा मार्ग नव्हे. भावी शिक्षणपध्दतीत आजचे अभ्यासक्रम, अध्यायन व परीक्षापध्दती इ. सर्व पुष्कळच बदलावी लागतील यात संशय नाही. आजचा औपचारिकपणाही बराच कमी होईल. तथापि हे सारे मान्य करुनही भावी पिढ्यांचा ज्यायोगे शिक्षणावरील विश्वास ढासळेल असे काहीही कारणं इष्ट नाही असं मला वाटतं.

वडिलधाऱ्या मंडळींच्या निराशेची दुसरी बाजू म्हणजे तरुणपिढीतील वैफल्याची भावना ही होय. आजकाल तरुण मंडळी काहीशी रागावलेली आहेत. आपण मिळवलेले शिक्षण प्रत्यक्ष जीवनातील प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत निरुपयोगी आहे, पदवी मिळाली तरी नोकरी मिळत नाही, सामाजिक दर्जा सुधारत नाही, आर्थिक परिस्थिती बदलत नाही, असा अधिकाधिक अनुभव आल्यानं तरुणांचा भ्रमनिरास होऊ लगाला आहे. आपली फसवणूक झाल्याचं त्यांना वाटतं; कोणीतरी आपला जणू विश्वासघातच केला आहे असे वाऊन त्यांच्या वर्तनात काही वेळा कटुताही दिसू लागते.

जीवनातील स्पर्धा अधिक तीव्र बनत चालल्याने नोकरी वा कामधंदा मिळणे कठीण होतं. पुढील मार्ग दिसेनासा होतो. अशा वेळी प्रस्थापित शिक्षणयंत्रणा व समाजरचनादेखील उलथून टाकावीशी वाटते. अशाच काहीशा भावनेमुळे कित्येक जण देश सोडून अन्यत्र कायमच्या वास्तव्यासाठी जातानाही दिसतात. इतर अनेकांच्या बाबतीत ते करीत असलेली कामे व त्यांनी मिळविलेले शिक्षण यांचा मेळ घालणं कठीण होतं.

वडिलाधाऱ्या मंडळींची निराशा आणि तरुणांचं वैफल्य या एकमेकांना पूरक व पोषक स्वरुपाच्या प्रतिक्रिया होत. शिक्षणपध्दतीवरील टाका जो जो कठोर होत जाते तो तो तरुणांचा तिच्यावरील विश्वास अधिकाधिक ढासळत जातो. टीका होते, परंतु सुधारणा मात्र होत नाही, अशी परिस्थिती वर्षानुवर्ष पाहिल्यानंतर तरुणांनी बंडास प्रवृत्त होऊ नये, तर काय करावं ? या प्रश्नांचं उत्तर सोपे नाही. आपण चालू पध्दतीचं समर्थनही करीत नाही आणि तिच्यात सुधारणाही करीत नाही. यामुळे निर्माण होणाऱ्या अवस्थेत भावनांचा उद्रेक दृष्टीस पडला तर आश्चर्य कसलं ?

शिक्षणकार्य हे केवळ नैतिक कार्य आहे असं नाही. कोणत्याही सामाजिक कार्यास नैतिकतेचं अधिष्ठान लागतं. त्यावाचून ते टिकाऊ व परिणामकारक होऊ शकणार नाही. शिक्षणकार्य हे तर याहून मौलिक स्वरुपाचं म्हणजे चारित्र्य घडविण्याचं कार्य आहे. यामुळं त्या क्षेतात आज आढळणारं अराजक समाज–जीवनाचे सारेच प्रश्न अधिकाधिक कठीण करीत जाणार की काय अशी भीती वाटते. ही भीती दूर करण्याचे व्यवहार्य मार्ग शोधले पाहिजेत. त्यासाठी आजच्या परिस्थितीचे काळजीपूर्वक विश्लेषण होणं आवश्यक आहे. मी तसा प्रयत्न करणार नाही. शिक्षणशास्त्रज्ञांचं, शिक्षकांचं, विचारवंतांचं ते कार्य आहे. केवळ विश्लेषण करुन न थांबता प्राप्त परिस्थितीत सुधारणा करण्याचा मार्ग त्यांनी दाखववावा व तो प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याची पध्दतीही स्पष्ट करावी येवढंच मी म्हणेन. तसं करताना विशिष्ट हितसंबंध व यातून निर्माण होणाऱ्या दुराग्रही वृत्तीला वा अन्य दोषांना मात्र त्यांनी बळी पडता कामा नये.

हे आवर्जुन सांगण्याचं कारण राजकीय नेते वा कार्यकर्ते यांच्यावर अशा दोषांचा आरोप नेहमी केला जातो हे होय. राजकारणी लोकांना शिक्षणक्षेत्राच्या बाहेर ठेवलं पाहिजे असं शिक्षणक्षेत्रातील मंडळी आग्रहाने प्रतिपादन करताना आढळतात. शिक्षणक्षेत्राची स्वायत्तता टिकविण्यासाठी हे आवश्यक आहे असं त्यांचं म्हणणं. उच्च शिक्षणाबाबत ही भूमिका योग्य आहे, असं म्हणता येतं. परंतु समाजजीवनाच्या विविध गरजांशी शिक्षणाचा सांधा जोडला पाहिजे, त्यावाचून आजची निराशेची व वैफल्याची भावना जाणार नाही, ही भूमिका एकदा स्वीकारली, की त्यातून स्वायत्ततेऐवजी पारस्पारिक आदराची भावना व तिच्यातून उद्‌भवणारा संवाद–वितंडवाद नव्हे –यालाच प्राधान्य द्यावे लागते.

अशा प्रकारच्या शिक्षणक्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद सुरु व्हावा या हेतूनेच मी काही विचार पुढे मांडीत आहे.

शिणिक्षेत्राविषयी सार्वत्रिक असमाधान आणि तरीदेखील सुधारणेचा अभाव या वस्तुस्थितीचा उलगडा कसा करणार ? तिच्या मुळाशी इच्छाशक्तीचा अभाव आहे, की विचारांची वाण आहे, की त्या वस्तुस्थितीतच अंतर्भूत होणाऱ्या सुधारणेच्या मार्गांतील काही अडचणी आहेत ? याचं उत्तर शोधलं पाहिजे. अडचणी निर्माण होण्याचं एक कारण गेल्या पंचवीस वर्षांत शिक्षणाची झपाट्याने झालेली वाढ होय. या वाढीमुळं शिणिला एक प्रकारचे सामुदायिक (मास) स्वरुप प्राप्त झालं आहे. दारिद्र्यामुळं पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी पालकांऐवजी राज्यावर वाढत्या प्रमाणात पडू लागली आहे. शिवाय, निरीक्षणाची व नियंत्रणाची जबाबदारी बऱ्याच प्रमाणात राज्याकडे आहेच. यामुळे रचनात्मक किंवा कार्यपद्धतीतील कोणताही बदल असो, त्याचे पडसाद व्यापक स्वरूपात सर्वत्र उमटतात. शासनात्मक (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह) आणि शैक्षणिक प्रश्न ही विभागणीदेखील समाधानकारक ठरेल की नाही याबद्दल शंकाच आहे. उदाहरणार्थ, अभ्यासक्रमातील एखादा विषय बदलून त्याऐवजी दुसरा घालणे हा वास्तविक शैक्षणिक प्रश्न. परंतु त्यायोगाने लागलीच काही शिक्षक बेकार होण्याचा व अन्य काहींची कमतरता भासण्याचा, आणि म्हणून एका परीने राजकीय स्वरूपाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. जे आहेत त्यांच्यावरच भागवावे असे म्हणल्यास शिक्षणाचा दर्जा खालावण्याचा धोका निर्माण होतो आणि अभ्यासक्रम बदलण्याचं प्रयोजनच नाहीसं होतं. काही वेळा स्वायत्ततेचा विचार केवळ उच्च शिक्षणापुरताच मर्यादित आहे असं म्हटलं जातं. परंतु तेथेही माध्यमिक शाळांसाठी लागणारे शिक्षक तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठांवर असल्याने अडचणी संभवतातच. म्हणून शासन आणि शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्ते यांनी एकमेकांविषयी आदर बाळगून देवाणघेवाणीच्या भूमिकेतून शैक्षणिक प्रश्न हाताळणे उचित ठरते.

जातीजातींत विभागल्या गेलेल्या आणि जन्मसिद्ध उच्चनीचतेच्या कल्पनांवर आधारलेल्या आमच्या समाजात बहुसंख्य लोक शिक्षणाला हजारो वर्षे वंचित झालेले होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. ज्ञानोपासना, ज्ञानाचे संवर्धन हे या समाजात विशिष्ट जातीचेच कार्य होते. अशा समाजात शिक्षण सर्वांना खुले होणे हा एका महान क्रांतीचा आरंभ होता. जन्मसिद्ध श्रेष्ठतेऐवजी गुणांच्या आधारावर ती ठरणे म्हणजे या समाजाचा कायापालट होणे; ही एक महान क्रांतीच होय. या क्रांतीचा आरंभ सुमारे दीडशे वर्षांपूर्वीच आमच्याकडे झाला. शिक्षणाचे हे रहस्य ओळखून त्या दिशेने प्रत्यक्ष कार्यप्रवण होणारांत महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास महात्मा जोतिराव फुल्यांनाच अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. दादाभाई नवरोजी, जगन्नाथ शंकरशेट, छत्रपती शाहू महाराज, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, आगरकर, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब

आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख अशा अखिल भारताला ललामभूत झालेल्या विभूतींनी शिक्षण प्रसाराची उज्ज्वल परंपरा निर्माण केली. शिक्षणप्रसाराची कल्पना यांच्या थोर कार्यामुळे आमच्या मनोभूमीत खोलवर रुजली. भारतीय पातळीवरही राजा राममाहन रॉय, सर सय्यद अहमद अशांसारख्या थोर व्यक्ती होत्याच. अलीकडच्या काळातील आम्हाला परिचित उदाहरण म्हणजे सयाजीराव महाराजांचे. तात्पर्य, मनोभूमीत रुजलेल्या या आकांक्षेला स्वातंत्र्य–प्राप्तीनंतर वाव मिळणे अगदी स्वाभाविक होते. मर्यादा होत्या त्या फक्त साधनसामग्रीच्याच.

स्वातंत्र्य–प्राप्तीनंतर झालेला शिक्षणप्रसार हा परंपरेचा प्रभाव तर खराच; पण त्यातही एक मोलाचा विचार होता. आपल्यापुढील निरनिराळे प्रश्न सोडवायचे झाल्यास त्यासाठी झपाट्याने आर्थिक विकास केला पाहिजे याविषयी सर्वांचे एकमत होते. आर्थिक, राजकीय, सामाजिक, शासकीय इ. सगळेच प्रश्न समाधानकारक रीतीने सोडवायचे झाल्यास ामच्या विविधतेतून एकता निर्माण केली पाहिजे, आणि त्यासाठी लोकशाही ही एकच निर्णयपद्धती योग्य होय, हेही सर्वमान्य झाले होते. तिचा पाया भक्कम करण्यासाठी लोकशाही म्हणजे केवळ बहुमताने निर्णय घेण्याची पद्धती असे न मानता ती जीवननिष्ठा बनावी लागेल याची जाणीवही अनेकांना होती. जात, गोत, धर्म, भाषा, प्रदेश, प्रतिष्ठा, पैसा इ. सर्वांपेक्षा व्यक्तीचे व्यक्ती म्हणून प्रथम्य मान्य केल्यावाचून, प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आदरबुद्धी बाळगल्यावाचून लोकशाही ही जीवननिष्ठा होऊ शकत नाही; तशी ती झाली पाहिजे. लोकशाही निर्णयपद्धती वा राज्यव्यवस्था राबवून, डोईस मत ही तरफ वापरून समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट आपण पुढे ठेवले होते. आर्थिक विकास हेदेखील असा समाज निर्माण करण्याचेच एक महत्त्वाचे साधन होते. हे स्वप्न साकार व्हावे यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग दिसत होता; आणि म्हणून तो निर्वेधपणे स्वीकारला गेला. स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या शिक्षणप्रसाराची ही खरी पार्श्वभूमी आहे, असे मी मानतो.

शिक्षणप्रसाराचे हे मुळातील कारण ध्यानात घेतले, की त्याबाबतची आपली जबाबदारी ध्यानात येईल. हा प्रसार होत असल्याने शिक्षणाचा दर्जा खालावेल अशी तक्रार वेळोवेळी कानावर येते. परंतु तो केवळ तात्कालिक परिणाम मानावा लागेल. उलट, समाजाची औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरू झाली, की त्यातील सगळे व्यवहार अधिक वैशिष्टपूर्ण होत जातात आणि ते चालविण्यासाठी वेगळ्या स्वरूपाचे ज्ञान, कौशल्य व क्षमता आवश्यक होतात. शिकलेले लोक मूठभर असतील तर अशा समाजाचे व्यवहार सुरळीततपणे चालूच शकणार नाहीत, ही गोष्ट आजच्या सुशिक्षितांनी ओळखली पाहिजे. शिक्षणाचा पअसार सुरू झाला, की त्याचा कस वा दर्जा सुधारण्याची इच्छा समाजातच निर्माण होईल अणि आमची शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलू लागेल. शिक्षण ही खऱ्याखुऱ्या अर्थाने समाजाची जबाबदारी बनेल.

आणखी एक दोन विचार आपणांपुढे मांडून मी थांबणार आहे. शिक्षणाच्या दर्जाचा विचार करताना परंपरागत चौकटीतून आम्हाला बाहेर पडावे लागेल. मूठभर लोक शिकत असताना शिक्षणक्रमाचे जे स्वरूप योग्य वाटे ते आता सर्व समाजच शिक्षणाकडे वळत असताना बदलावयास नको काय ? हा प्रश्न केवळ शिक्षणाचा आलेख बदलून सुटणार नाही. शालेय शिक्षणक्रमाची ११ वर्षे आणि महाविद्यालयाची चार वर्षे या ऐवजी १०+२+३ असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा त्योत फक्त आकड्यांचे कोष्टक बदलून बेरीज सारखीच काढण्याची कल्पना अभिप्रेत आहे असे मला वाटत नाही. शिक्षण समाजाभिमुख करण्याच्या दिशेने टाकलेले ते पहिले महत्त्वाचे पाऊल होय. ते फलदायी होण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमात विविध प्रकारच्या कौशल्यांना, व्यावसायिक हुन्नरांना, क्षमतेला स्थान मिळाले पाहिजे, आणि त्याची नव्याने उभारणी झाली पाहिजे. हे बदल करणे वाटते तिके सोपे नाही. कारण एका परीने ते शिक्षकांतील बदलच होतात; त्यासाठी शिक्षकांचा दृष्टिकोण बदलणे इष्ट व आवश्यक ठरते. नवे कौशल्य प्राप्त करून घेण्याची शिक्षकाची तयारी नसेल तर विद्यार्थ्यांना ते कसे प्राप्त होणार ? निदान तरुण शिक्षकांनी तरी प्रतिष्ठेची खोटी कल्पना उराशी न बाळगता, पगार, महागाई, नोकरीचे स्थैर्य इत्यादी प्रश्नांबरोबरच इकडेही लक्ष द्यावे आणि आपला जबाबदारीचा वाटा उचलावा असे मी सुचवीन. आज जे स्नातक पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत त्यांतील काहीजण शिक्षण हेही कार्यक्षेत्र म्हणून निवडतील. त्यांनी आपण जे शिकलो व जसे शिकलो ते व तसेच भावी पिढ्यांना शिकवणार आहोत असे समजता नये. यापुढे सर्व समाजच सतत शिकत राहिला पाजि. विद्यापीठातून बाहेर पडलो की शिक्षण संपले हा औपचारिक दृष्टिकोण झाला. त्याच्यापुढे जाण्याची गरज आता निर्माण होत आहे. अधिकाधिक होणार आहे. आणि या बाबतीत सुशिक्षितांनी, विशेषतः शिक्षकांनी, आदर्श घालून दिला पाहिजे असा मी आग्रह धरीन.

सभोवतालचे जीवन आज झपाट्याने बदलत आहे; या बदलाची गती वाढविण्याचे प्रयत्नही आपण करीत आहोत. विज्ञान आणि तंत्रविद्या यांच्या योगाने आजच्या जगात प्रचंड क्रांती होत आहे. जग लहान होत आहे. जीवनाची सर्व अंगोपांगे तंत्रविद्येने व्यापली आहेत. आणि सर्व क्षेत्रांत होत असलेल्या बदलाची गती पाहिली म्हणजे मन क्षणभर भांबावून जाते. या घटनेचा एक साधा अर्थ असा की यापुढे भविष्याकाळातील प्रश्न सोडवताना भूतकाळाचा उपयोग होऊ शकणार नाही. परंपरेचे प्राबल्या असलेल्या आमच्या समाजात परंपरेचा अर्थ पुनः पुनः तपासण्याची गरज निर्माण होईल आणि भविष्याकडे दृष्टी अधिकाधिक वळवावी लागेल. आजची श्रद्धास्थाने नाहीशी होतील असे नाही; परंतु आजचे अभिमान, वाद, कलह, भेदाभेद हे सारेच अप्रस्तुत व अयोग्य म्हणून सोडावे लागतील, यात मुळीच शंका नाही. श्रद्धांचा अर्थ पुनः लावावा लागेल, ध्येयसृष्टी नीट पारखावी लागेल. ही जबाबदारी आता तुमच्यावर येऊन पडणार आहे असे मला माझ्यापुढे बसलेल्या

तरुण मित्रांना सांगायचे आहे.

हे सर्व साक्षेपाने साधता यावे यासाी केवळ ज्ञानाची उपासना वा बुद्धीची जोपासनाच नव्हे तर भावनांची प्रगल्भता, अंतःकरणाचा मोठेपणा यांचीही आवश्यकता आहे. या दृष्टीने आजच्या शिक्षणक्रमातील खेळ, सांस्कृतिक कार्य इत्यादींचा व त्याचबरोबर राष्ट्रीय छात्रसेना, नॅशनल स्टुडंटस् सर्व्हिस किंवा महाराष्ट्रातील भूसेना अशासारख्या उपक्रमांकडे पाहिले पाहिजे. तरुण विद्यार्थी मित्रांना सामाजिक परिस्थितीचे यथार्थ आकलन व्हावे, आणि त्यांच्या भावनांचे शुद्धीकरण होऊन सामाजिक समता स्थापनेच्या तीव्रतेची त्यांच्या मनात वाढ व्हावी हा या उपक्रमामागील हेतू आहे. कोण उत्तम खेळतो याला महत्त्व आहेत; परंतु त्याबरोबरच जिंकला किंवा पराभूत झाला असताना तो कसा वागतो याला तितकेच किंबहुना त्याहूनही अधिक महत्त्व आहे, हे ध्यानात ठेवले पाहिजे.

शिक्षणक्षेत्राची स्वातंत्र्य–प्राप्तीनंतरच्या गेल्या सत्तावीस वर्षांत पुष्कळच वाढ झाली आहे. शिक्षणसंस्थाही वाढल्या आहेत. येथील दरडोई उत्पन्नाच्या मानाने प्राथमिक शिक्षण घेणारांची संख्या पाहिल्यास आमच्या पातळीवरील इतर विकसनशील राष्ट्रांच्या मानाने ती दुप्पटीहून अधिक आहे. विज्ञान क्षेत्रातील दरवर्षी तयार होणाऱ्या स्नातकांची (पदवीधरांची) संख्या पाहिल्यास जगात आमचा तिसरा क्रमांक लागतो. आमच्या आजच्या समस्या अत्यंत कठीण आहेत हे मान्य केलेच पाहिजे. त्यातून उपाय काढण्याचे आमचे आजवरचे प्रयत्न अपेक्षेप्रमाणे सफल झाले नाहीत हेही नाकारता येत नाही. यामुळे आमची तरुण पिढी आज रागावलेली आहे हे मला माहीत आहे. शिक्षणाच्या साहाय्याने सामाजिक प्रश्नांचे आकलन झाल्यामुळे त्यांना राग आला आहे हे उघड आहे. आणि म्हणूनच हे आकलन व्यर्थ जाणार नाही अशी आशा बाळगण्यास आधार आहे. जमिनीत टाकलेले बी एकदा अंकुरले, की वरच जाणार, खाली नव्हे यात शंका नाही. गेल्या सत्तावीस वर्षांत पेरलेल्या शैक्षणिक बीजाला आता अंकुर फुटू लागले आहेत. आजच्या एरवी निराशाजनक वाटणाऱ्या परिस्थितीत हा एक महत्त्वाचा आशेचा किरण आहे असे मानणारा मी आहे.

आपण निमंत्रण देऊन मला मान दिलात याबद्दल मी आपले पुनः आभार मानतो. ज्यांनी आज निरनिराळ्या पदव्या संपादन केल्या आहेत त्या सर्वांचे, उपस्थितांचे व अनुपस्थितांचेही, मनःपूर्वक अभिनंदन करतो. माझ्या सर्व शुभेच्छा त्यांच्याबरोबर राहतीलच. या नव्याने स्थापन झालेल्या विद्यापीठाच्या परंपरा उज्ज्वल करण्यात त्यांनी सहभागी व्हावे आणि जीवनातील निरनिराळे प्रश्न सोडविण्यासाठी सिद्ध व्हावे. शिक्षणाच्या योगाने प्राप्त झालेल्या सामर्थ्याचा उपयोग करताना आपणावरील सामाजिक जबाबदारीचे विस्मरण पडू देऊ नये अशी माझी विनंती आहे. आपल्या देशाचे, स्वतंत्र राष्ट्र म्हणून बाहेरील जगाशी येणारे संबंध पाहण्याची, वाढविण्याची, सुधारण्याची

जबाबदारी मी नुकतीच स्वीकारली आहे. यामुळे आता देशातील अंतर्गत घडामोडींशी माझा संबंध सुटला आहे किंवा सुटेल असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. उलट, महाराष्ट्रातील घडामोडींशी राष्ट्राचा आणि राष्ट्रातील अंतर्गत घडामोडींशी आमच्या परराष्ट्रीय धोरणाचा व जगातील स्थानाचा अतूट संबंध आहे. यामुळे आपण काय करता किंवा करणार याकडे माझे लक्ष असणे अपरिहार्य आहे. आपणांवर आज असलेल्या वा यापुढे पडणाऱ्या जबाबदाऱ्या दक्षतेने व साक्षेपाने पार पाडण्याचा प्रयत्न आपण सर्वजण करू या, एवढेच सांगून मी आता थांबतो.

।। जय हिंद ।।

❒❒❒